*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

# जयप्रकाश नारायण आणि डॉ. राममनोहर लोहिया यांचा राजकीय विचारांचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. सय्यदा अनिस फतेमा**
प्राचार्य
डॉ. रफ़िक़ झकारिया कॉलेज फॉर वूयमेन
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

**डॉ. सय्यद मुज्तबा कादरी**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग
मौलाना आझाद कॉलेज
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

**खालील क. पठाण**
संशोधक
राज्यशास्त्र विभाग
औरंगाबाद, महाराष्ट्र, भारत.

**प्रस्तावना :**

भारतीय राजकारणामध्ये संकुचित पक्षीय राजकारणापलीकडे जावून विधायक दृष्टिने विचार करणारी महात्मा गांधी, विनोबा भावे यांची परंपरा जोपसणारे भारतातील समाजवादी नेतृत्व म्हणजे जे.पी. आणि लोहिया होय. पोथीनिष्ठ समाजवादाला भारतीय दृष्टि देण्याचे कार्य जे. पी. आणि लोहियांनी केले. लोहियांना भारतीय समाजवादाचा पथदर्शक समजले जाते. तर जे. पी. हे समाजवादाकडून सर्वोदयाकडे मार्गक्रमण करतात. जे.पी., आचार्य नरेंद्र देव, अशोक मेहता, मधु लिमये, राजनारायण, जनेश्वर मिश्रा, मुलायमसिंग यादव, लालू प्रसाद यादव, नितीशकुमार इ. प्रगल्भ समाजवादी विचारांची परंपरा भारतामध्ये आहे.

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

भारतीय समाजवादी नेतृत्व देशाला पर्याय देण्यामध्ये यशस्वी झाले. परंतु वैयक्तिक मतभेदामुळे पक्षाचे कार्यक्रम आणि विचारधारेची अंमलबजावणी होऊ शकली नाही. ९ व्या लोकसभेत व्ही. पी. सरकारने (अर्थमंत्री मधु दंडवते) उत्पादन खर्चाच्या दिडपट पेक्षा जास्त उत्पादनाची किंमत असू नये अशी घोषणा केली. जे. पी. आणि लोहिया पूर्ण आयुष्य ज्या वंचित वर्गासाठी जगले त्यांचे अनुयायी म्हणून व्ही. पी. सिंगने मंडल आयोगाची अंमलबजावणी करून पिछडा वर्गाला न्याय देण्याचे कार्य केले.[१] मोरारजी देसाई सरकारने आणिबाणीचा सूड भावनेने बदला घेण्यालाच समाजवाद मानले. सह अस्तित्वाच्या मूल भावनेवर समाजवादी विचारसरणी आधारलेली असतांनाही समाजवाद्यामध्ये वैचारिक फुटीरतेची दुही पेरली गेली ती आजपर्यंत कायम आहे. आजही बिहार, उत्तरप्रदेश, ओरिसा, विशेषतः उत्तर भारत आणि कर्नाटक राज्यात समाजवादी विचाराच्या पक्षाचे प्राबल्य आहे. मुलायमसिंग यादव, लोहियांना तर नितीशीकुमार जे. पी. आंदोलनाचे आपत्य आहे. जे. पी. आणि लोहिया मात्रात्मक मतभेदावर मात करू शकले असते तर निश्चित समाजावादी समाजाच्या निर्मितीसाठी भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये समतोल विकास करण्याचे उद्देश साध्य करता आले असते.

प्रस्तुत शोध लेखात लोहिया आणि जे. पी. च्या राजकीय विचाराचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. दोन्हीमध्ये समाजवादी विचाराप्रती असेलेली सहमती आणि विरोध तसेच दोन्ही राजकीय विचारवंतांची आजच्या संदर्भात असलेली प्रासंगिकता याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

## जे. पी. आणि लोहिया यांच्या राजकीय विचारांची तुलना :

जे. पी. लोहियांपेक्षा १० वर्षांनी मोठे होते. जे. पी. नी अमेरिकेमध्ये पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केले. परंतु पदवी मिळण्याच्या अगोदर आईच्या आजारपणाची बातमी मिळाल्यावर पदवीचा त्याग करून ते १९२८ ला भारतात पोहचले. लोहिया जे. पी. नंतर ६ वर्षांनी १९३४ मध्ये जर्मनी येथून पीएच.डी. पूर्ण करून वयाच्या २२ वर्षी भारतात पोहचले[२] सन १९३४ च्या काँ. सो. पार्टीच्या स्थापनेच्यावेळेस जे. पी. आणि लोहिया एकत्रित आले. लोहिया कम्युनिस्ट धारेचे प्रखर विरोधक होते. तर जे. पी. अमेरिकेमध्ये असतांना मार्क्स आणि एम. एन. रॉयच्या प्रभावातून सक्रीय कम्युनिस्ट झाले होते. सक्रीय कम्युनिस्टच्या रूपातच ते भारतात पोहचले. कालांतराने त्यांच भारतीय कम्युनिस्ट पार्टीची विचारधारा आणि चरित्र याबद्दल मोहभंग झाला. साम्यवादी भारतीय राष्ट्रीय आंदोलनाला भांडवलशाहीचे पिंट्टू असे संबोधित करायचे परिणाम स्वरूप भारतीय साम्यवादी पक्षासोबत त्यांचे मतभेद निर्माण झाले. त्यांची धारणा होती की, गुलाम देशामध्ये कम्युनिस्ट पार्टी स्वातंत्र्याच्या संग्रामामध्ये सहभागी असते. परंतु भारतीय कम्युनिस्ट पार्टी स्वातंत्र्याच्या लढाईमध्ये आपली विशेष प्रतिबद्धता दाखवू शकली नाही. साम्यवादी पक्षाच्या भूमिकेमुळे जे. पी. कम्युनिस्ट विचाराकडून काँग्रेस पक्षाच्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या विचार धोरेचे एक शिपाई बनले. नेहरूंनी त्यांना पक्षाच्या किसान मोर्चाचे सचिव बनविले.

काँग्रेस सो. पार्टीच्या स्थापनेनंतर जे. पी. आणि लोहियामध्ये समाजवादी विचाराप्रती एकरूपता निर्माण झाली. कालांतराने जे. पी.चा वैचारिक झुकाव पुन्हा साम्यवादी पक्षाकडे होऊ लागला. कालांतराने जे. पी.ज्या नेतृत्वाखाली काँग्रेस सोसालिस्ट पार्टीच्या एका मोठ्या गटाने साम्यवाद्याशी पुन्हा जवळीक केली[3]. दोन्ही पक्ष समान कार्यक्रमावर एकत्रित आले पुन्हा जे. पी. चा साम्यवादांशी मोहभंग झाला. परंतु तोपर्यंत ए. के. गोपालन, नम्बुद्रीपाद, राम मूर्ती काँ.सो. पार्टी ला सोडून कम्युनिस्ट पक्षात सहभागी झाले. या नेत्यांचे पक्ष सोडून गेल्यामुळे पक्षाला जो आघात झाला त्याची क्षतीपूर्ती आजपर्यंत संभव झाले नाही. १९४२ च्या क्रांतीमध्ये जे. पी. आणि लोहिया एकत्रिपणे संघर्ष करीत होते. दोघांना नंतर झेलमध्ये जावे लागले. दोघेही पोलिसांच्या गोळीबाराचा सामना करीत झेलमधून बाहेर पडले. या क्रांतीने दोघांना भावनात्मक सुत्रामध्ये बांधले होते. कर्म आणि समर्पणापुढे वैचारिक आणि चारित्रिक मतभेद पूर्णपणे संपले होते. १९३४ चे १९५४ पर्यंत क्रॉ. सो. पार्टी, प्रजा सो. पार्टी चे सदस्य राहिले. लोहिया आणि जे. पी. च्या नाते संबंधाचे अध्ययन जबरदस्त मनोवैज्ञानिक विषय आहे. जे. पी. मध्ये जबरदस्त संघटन क्षमता होती.[४] त्याचबरोबर एक व्यवस्थाप्रिय व्यक्ती म्हणून जे. पी. ची ओळख होती तर दुसऱ्या बाजूला लोहिया मुक्तछंदपणे जीवन जगत असे. लोहियांना संघटनाच्या महत्त्वाची जाणिव होती. परंतु त्यांच्या आचरणामधून संघटन बनविणे आणि चालविणे याचे प्रत्यय येत नाही. नंतरच्या कालखंडात त्यांनी समाजवादी इतिहास लिहताना स्पष्ट केले की व्यक्तीगत स्वातंत्रेला संघटनेच्या मुकाबल्यात एक मूल्य मानतात. व्यक्तीगत स्वातंत्र्य आणि संघटनामधून एकाची निवड करावयाची झाल्यास मी व्यक्तीगत स्वातंत्र्याची निवड करेन.

या व्यक्ती भेदामुळे जे. पी. आणि लोहियामध्ये वैचारिक मतभेद होऊन मतभेद वाढतच गेले. जे.पी. आणि लोहियामध्ये मतभेद १९५२ मध्ये सार्वजनिकरित्या समोर आले[५] जवाहरलाल नेहरूनी जे. पीला. पत्र लिहून काँग्रेस आणि समाजवादी पक्षानी एकमेकांना सहकार्य करून सहयोगाच्या मार्गाने पुढे जावे. सहयोग हा पार्टी आणि सरकार दोन्ही ठिकाणी असावा अशी विनंती जे. पी. ना पत्र लिहून केली. त्या मोबदल्यात जे. पी.नी नेहरू समासेर १४ कलमी दिर्घकालीन विचारांचा पूर्वगामी कार्यक्रम ठेवला. नेहरूना तो

कार्यक्रम मान्य झाला नाही. पुढे लोहियांना या पत्राची माहिती मिळाली. पत्राचाराच्या सर्व प्रक्रियेला लोहियांनी बेकायदेशीर ठरविले. पक्षाच्या अधिकाराचे उल्लंघन केल्याचा ठपका लोहियांनी जे. पी. वर ठेवला. लोहियांची चुनौतीपूर्ण मुद्रा जे. पी. नां आवडली नाही. दोघामध्ये मतभेद वाढतच गेले.[६] दरम्यानच्या काळात आचार्य कुपलानी व त्यांचे समर्थक काँग्रेस सोडून बाहेर पडले. त्यांनी प्रजा कामगारा पार्टी नवीन पक्ष बनविला. कालांतराने त्यांनी आपला पक्ष काँ. सो. पार्टीमध्ये विलीन केला व पक्षाचे प्रजा सो. पार्टी झाले. या नवीन पक्षाचे अधिवेशन बैतूल (मध्यप्रदेश) येथे बोलाविण्यात आले. या अधिवेशनात अशोक मेहता यांनी काँग्रेस समाजवादी कार्यक्रम राबवित असल्याने पक्षाने काँग्रेसशी जवळीक करावी अशी भूमिका घेतली. लोहियांनी मेहताच्या भूमिकेचा प्रखर विरोध केला. मेहताच्या भूमिकेचे जे. पी. नी समर्थन केले. अधिवेशन मध्येच थांबविण्यात आल्याने पक्षामध्ये पडणारी संभाव्य फूट टळली.[७]

दरम्यानच्या काळात विनोभा भावेंच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन जे. पी. भूदान चळवळीमध्ये सामील झाले व स्वतःला जीवनदायी घोषित केले. बैतुलच्या अधिवेशनानंतर ठिक ६ महिन्यांनी पक्षाचे अधिवेशन इलाहाबाद येथे बोलाविण्यात आले[८]. जे. पी. अधिवेशनात उपस्थित राहिले. परंतु सक्रियपणे कोणत्याच मुदद्यावर त्यांनी भाष्य केले नाही. भूदान चळवळीसाठी त्यांनी पी. डी. टंन्डन शाळेत भाषण दिले. अशोक मेहतासुद्धा अधिवेशनात जे. पी. प्रमाणे फक्त उपस्थित राहिले. सगळे अधिवेशन लोहियांना सर्मर्पित केल्यासारखी भूमिका जे. पी. आणि मेहतांनी घेतली. जे. पी. नी राजकीय उदासिनता वाढतच चालली होती. यावेळेस एक मोठी राजकीय घटना घडली. कोची - त्रावणकोर येथील प्रजा समाजवादी पक्षाचे सरकार होते. वेगळया राज्याच्या मागण्यासाठी आंदोलनक आंदोलन करत असतांना पोलिसांकडून गोळीबार करण्यात आला. लोहिया शासनपुरस्कृत शासनाच्या विरोधात होते. या गोळीबारात दोन अंदोलकांनी जीव गमावला. लोहियांनी पक्षाचे जनरल सेक्रेटरी म्हणून मुख्यमंत्री पट्टमधानु पिल्लई ला राजीनामा देण्याची आव्हाणे केले ह्या आवहनावर पक्षामध्ये तिव्र मतभेद निमार्ण झाले. ह्या मतभेदातच जे. पी. राजकारणात पुन्हा सक्रीय झाले. लोहियाच्या आग्रहावरुन नागपुर येथे पक्षाचे विशेष

अधिवेशन बोलविण्यात आले.[१] ह्या अधिवेशन जे.पी. नी लोहियाच्या मागनीचा प्रखर विरोध केला तसेच जे.पी. नी. पक्ष्याच्या सर्व सदस्याना गोळीबाराच्या कारनाने राजीनामा देणे उचीत नाही अशी भुमिका सदस्यासमोर मांडली बहुतांश सदस्यानी जे.पी. ह्या भुमिकेचे समर्थन केले. लोहियाचा पराभव झाला. लोहियानी पक्षाच्या जनरल सेक्रेटरी पदाचा राजीनामा दिला. पुन्हा जे. पी. आणि लोहिया एकमेका समोर उभे ठाकले याची परिणाीती लोहियाना पक्षातुन निलंबीत करण्यात झाली. जयपुर अधिवेशनामध्ये लोहियाच्या निलबंनाचा ठराव स्तःतहा जे. पी. नी मांडला कालातराने जे.पी. ला आपली चुक लक्षात आली. ह्या निलंबनामुळे पक्षाबरोबर समाजवादी आंदोलनाचा आतोनात हानी झाली. जे. पी. नी नंतर प्रजा सो. पार्टी लोहियाची सो. पार्टी चे एकत्रीकरण करण्याचे प्रयत्न केले. हे प्रयत्न यशस्वी होऊ शकले नाही. पंरतु नंतरच्या काळात दोघाची भेट हैद्राबाद येथे झाली या भेटीत जे.पी. कोमल आणि संवेदन शिलपणे लोहीयाशी जुळवुन घेण्याचा प्रयत्न करतात जे.पी. ना लोहिया प्रती निर्माण झालेल्या दूराव्याबद्दल निश्चितय प्रश्चाताप झालेला आसावा.

१९६७ आक्टोबर मध्ये लोहियाच्या पुरुषग्रंथीचे आपरेशन झाले. त्यावेळेस जे.पी. लोहियासोबत होते. लोहियाची सुश्रषा ते करायचे. काही वेळ फक्त झोपण्यासाठी तसेच आपल्या नित्य गरजा पुर्ण करण्यासाठी आपल्या निवासस्थनी जात होते. जे.पी. लोहियाच्या शेवटच्या क्षणा पर्यंत सोबत राहिले. लोहिया आणि जयप्रकाश यांच्यामध्ये मतभेद आणि सहमती दोन्ही पैलु होते. एकमेकापासुन मुक्त होण्याची जिद्द तर एकमेकाप्रती सर्मपन भाव होते. हे संबंध जर लवचीक असते तर भारतात समाजवादी आदोकांनाची दशा आाि दिशा उज्जवल राहिली आसती ह्या दोघानी मिळूण इतिहासाला ठोकर मारली.

**जे.पी आणि डॉ. लोहिया यांच्या राजकीय विचारांची प्रासांगिकता :**

जे. पी. आणि लोहियांचे भारताला समाजवादी राष्ट्र बनविण्याचे स्वप्न होते. भारतामध्ये समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी जो संघर्ष ह्या दोन्ही नेत्यानी केला त्यामुळेच कॉग्रेस पक्षाला समाजवादी विचारधारा स्विकारावी लागली. नेहरुनी स्पष्ट केले की कॉग्रेस पक्ष हा समाजवाद आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. १९७६ मध्ये इदिरा गांधीयानी ४२ वी

*"Knowledge Scholar"*
*An International Peer Reviewed E-Journal Of Multidisciplinary Research*
*Volume: 02, Issue: 05, Sept.-Oct. 2015* *eISSN NO. 2394-5362*
*Impact Factor (IIFS) - 0.776*

घटनादूरुस्ती करुन भरतीय राज्य घटनेच्या सरनाम्यामध्ये धर्मनिरपेक्षता, समाजवाद हे दोन महत्वाची उदिदष्टे जोडली त्याचबरोबर बॅकाचे राष्ट्रीयकरण, सिलिग अक्ट (कुळ कायदा) आणला. इदिरा गांधी यांनी जाहीर केले की, समाजवादी विचारसरणी शासन करण्याचा आदर्श असेल मोरारजी देसाई-मंडल आयोगाची निर्मिती व्ही.पी. सिंग- मंडल आयोगाची अमलंबजावनी तसेच राजीव गांधीयानी ७३ वी ७४ वी घटनादूरुस्ती करुन पंचायत राज कायदा आणुन सत्त्चे विक्रेद्रीकरण केले. जे.पी. आणि लोहियाना भष्ट्राचाराबद्दल प्रचंड चिड होती. जागतिकीकरणामुळे विकासाचा असमतोल निर्माण होत आहे. पर्यावरणीय समस्या ह्या सर्व जगासोबत आपल्या देशामध्ये सुद्धा आज भेडसावत आहे. देशाने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. शेती अर्थव्यवस्थेचा कणा असतांना त्याकडे दूलर्ष करण्यात आले. आज शेतकरीच्या आत्महत्या संपुर्ण भारतभर होत आहे. पन्नास-शंभर शासकीय नोकरिण्या जागेसाठी लाखो बेरोजगाराचे अर्ज येते आहे. हे सर्व प्रश्न मानवनिर्मित आहे. हे प्रश्न सोडवीण्यासाठी अहिसांत्मम्क मार्गाचा अवलंब करणे आवश्यक आहे. जे.पी. आणि लोहियांचे सह-अस्तित्ववादी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व हे विचार ह्या समस्या सोडविण्यासाठी दिशादर्शक वाटतात.

## संदर्भ सुची

१) विरेंद्र शर्मा : आधुनिक भारतीय राजनैतिक विचारधारा- २००८- नई दिल्ली - युनिवर्सिटी पब्लिकेशन.

२) प्रसाद सिंह, सुनिल मिश्र : समाजवादी आंदोलन के दस्तावेज १९३४ ते ५२-१९६९ प्रतिपक्ष प्रकाशन, दिल्ली.

३) भा.ल. भोळे : आधुनिक भारतातील राजकीय विचार- २००३, नागपुर, पिपंळापुरे अॅन्ड कं पब्लिशर्स.

४) ओमप्रकाश दिपक, अरविन्द मोहन : लोहिया एक जिवनी, २००६, बिकानेर वाग्देवी प्रकाशन.

५) राजकमल राय : राममनोहर लोहिया आचरण की भाषा, २००८, इलाहाबाद लोकभारती प्रकाशन.

६) मस्तराम कपुर : राममनोहर लोहिया रचनावली, २००८ (खंड १ ते १०), अनामिका पब्लिशर्स डिस्ट्रीब्युटर्स (प्रा.) ली. नई दिल्ली

७) शरद ओंकार : १९६९ (डॉ. राममनोहर लोहिया), इलाहाबाद, लोकभारतीय प्रकाशन

८) चंद्र हरीश, पद्दमिनी : १९९२, डॉ. राममनोहर लोहिया की कहानी उनके साथीयो की जुबानी. noida news paper-Delli.

९) ओमप्रकाश मिश्राः अगर राममनोहर लोहिया होते ,२००८, लोकभारती प्रकाशन इलाहाबाद.